**नि.फौ.ख.क्र.२८/२००९**
सरकार – वि.- अमित करमळकर
**निशाणी क्र. ६०**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – हरीभाऊ भगवान मारकड - तपास अधिकारी
वय – ६९ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,
सध्या रा. - वडगांवशेरी, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस.काशीद यांचे मार्फत सुरु-</u>**

सन २००९ मध्ये मी पोलीस उप.निरीक्षक या पदावर गुन्हे अन्वेषण शाखा, लोहामार्ग पोलीस स्टेशन, पुणे येथे कार्यरत होतो. गुन्हा क्र. १०/२००९ कलम ३८४ व कलम १७० भा.दं.वि चा तपास मी केला आहे. दि. १९/०१/२००९ रोजी फिर्यादीने फिर्याद दिली होती की, डेक्कन एक्सप्रेस गाडीमध्ये जनरल डब्यामध्ये पुणे ते ठाणे जाण्यासाठी ते बसले होते. प्लॅटफॉर्म क्र. ६ वर दोन पोलीस शिपाई होते. त्यांनी पाहिले की, एक इसम दुस-या इसमास खांद्यावर हात टाकुन ओढुन घेवुन जात आहे. मी फिर्यादीचा जबाब नोंदवुन घेतला होता. मी तीन साक्षीदारांचे जबाब नोंदवले. फिर्यादीचे तिकीट हस्तगत केले. आता मला सदरचे तिकीट दाखवण्यात आले. ते तेच असुन त्यास **नि.क्र. ६१** देण्यात येतो. गुन्ह्यात आरोपी नामे करमळकर यास अटक करुन त्याच्याकडील ४००/- रुपये पंचा समक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी व पंचाची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. ६२** देण्यात येतो.

२. आता मला अटक पंचनामा नि.क्र. ५७ दाखवण्यात आला. तो तोच आहे. माझी बदली झाल्याने पुढील तपास हे.कॉ. कदम यांनी केला. प्रकरणात जप्त करण्यात आलेले ४००/- रुपये दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला मुददेमाल क्र. ५/२००९ मध्ये जप्त करण्यात आलेले ४००/- रुपये (१०० रुपये चलनाच्या ४ नोटा) दाखवण्यात आल्या. त्या त्याच असुन त्यास एकत्रीत आर्टिकल अ संबोधण्यात येते. आरोपीला पाहिल्यास मी

ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण .**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.02.26 17:11:26 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २६/०२/२०२६